## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

### अपिल क्रमांक : के.आर- ३१९३/२०२१

अपिलार्थी, श्री.प्रकाश मोहनदास केसवानी
बैरक नं.१९१७, रूम नं.२०,
शनि मंदिरच्या मागे, ओ.टी.सेक्शन
उल्हासनगनर, जि.ठाणे ४२१ ००५.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता,
नगररचना विभाग,उल्हासनगर महानगरपालिका,
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड,
उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा नगररचाकार,
नगररचना विभाग,उल्हासनगर महानगरपालिका,
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड,
उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३.

द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ०८.०४.२०२४

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २०.०९.२०२१ | -- | २९.१०.२०२१ | २४.११.२०२१ |

अपिलार्थी यांनी दि. १४.१२.२०२१ रोजीच्या अर्जान्वये *" माहिती मिळाली नाही. प्रथम अपिल आदेश असमाधानकारक मिळाले "*असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ०८.०४.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तसेच जन माहिती अधिकारी श्री.संजय पवार, कनिष्ठ अभियंता, नगररचना विभाग, उल्हासनगर महानगरपालिका उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" उल्हासनगर महानगरपालिका नगररचना कार यांचे कडून दिलेल्या नवीन इमारतींच्या परवाना मधील ज्या नवीन इमारतींना वाढीव काम (vailation) करण्यात आला आहे त्या इमारतींची सन २०१४ ते सन २०२१ आजपर्यंत कनिष्ठ अभियंता द्वारे केलेली कार्यवाही व अन्य केलेली कार्यवाही सह सर्व वाढीव बांधकाम केलेली इमारतीचा बांधकाम क्रमांक, नाव व पत्ता सोबत संपूर्ण सविस्तर लेखी स्वरुपात माहिती द्यावी. "*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये *" माहिती प्राप्त झालेली नाही "*असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.०८.१०.२०२१ रोजीच्या पत्रानवये पुढीलप्रमाणे उत्तर दिलेले आहे.

*“आपण आपल्या पत्रात नमूद केलेली माहिती ही माहितीच्या अधिकाराच्या व्याख्येत बसत नाही. माहितीच्या अधिकारात फक्त या कार्यालयाच्या अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती, कागदपत्रे इत्यादी माहिती देण्याची तरतूद आहे. त्यामुळे ती आपणास देता येत नाही.”*

अपिलार्थींनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन, दि.२४.११.२०२१ रोजी पुढीलप्रमाणे आदेश पारित केलेले आहेत.

*" अपिलार्थी यांनी माहिती अधिकारात मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे ती देता येत नाही. सबब प्रथम अपिल निकाली काढणेत येत आहे."*

सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.०८.१०.२०२१ रोजीच्या पत्रान्वये सदर माहिती ही माहितीच्या व्याख्येत बसत नसल्याचे कळविले आहे. तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सदर माहिती ही विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे देता येत नसल्याचे आदेश पारित केले आहेत. तथापि या प्रकरणामध्ये विस्तृत स्वरुपाची माहिती म्हणजे किती माहिती आहे हे समोर आलेले नाही. त्यामुळे याबाबत निश्चित निर्णय घेता येत नाही. त्यामुळे सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांची उपस्थिती अनिवार्य राहिल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि.१०.०६.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

(शेखर चन्रे)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०८ एप्रिल, २०२४ .